
स्वामी रामतीर्थ
पु. पं. गोखले.

# स्वामी रामतीर्थ

पु. पां. गोखले

समाजभूषण बाबुराव गोखले स्मारक समिती,
पुणे विभाग

Swami Ramatirtha
P. P. Gokhale

**प्रकाशक**
समाजभूषण बाबुराव गोखले
स्मारक समिती, पुणे विभाग
२७३, शनिवार पेठ,
पुणे ३०

© सर्व हक्क सुरक्षित

**प्रकाशन दिनांक :**
१५ नोव्हेंबर १९९८
बाबुराव गोखले जन्मशताब्दी

**मुद्रक :**
प्रमोद वि. बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे-३०

**किंमत १५/- रुपये**

**पु. पां. उर्फ बाबुराव गोखले**
**यांची बालवाङ्मय सेवा**

❖

गणपती बाप्पा

जय बजरंग

समर्थ रामदास

स्वामी रामतीर्थ

लो. टिळक

गोखल्यांच्या गोष्टी

भले भले साने गुरूजी!

बंडवाले नानासाहेब

❖

**समाजभूषण बाबुराव गोखले**
**स्मारक समिती**
२७३, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

# स्वामी रामतीर्थ

पंजाब प्रांतातील, गुजराणवाला जिल्ह्यातील, 'मुरलीवाला' या गावी इ.स. १८७३ साली तीर्थरामांचा जन्म झाला. तीर्थराम हे संत तुळसीदास यांच्या वंशातील समजले जातात.

तीर्थरामांचे शालेय शिक्षण मुरलीवाला व गुजराणवाला या गावी झाले; महाविद्यालयीन शिक्षण लाहोर येथे झाले; आणि तीर्थराम एम. ए. झाले. तीर्थरामांची घरची अत्यंत गरिबी असल्यामुळे शैक्षणिक काळात त्यांना अनेक अडचणींवर मात करावी लागली.

तीर्थराम, सियालकोट मिशन हायस्कूल व लाहोर मिशन कॉलेज मध्ये गणिताचे अध्यापक झाले. लहानपणापासूनच तीर्थरामांचा कल आध्यात्मिक असल्यामुळे त्यांनी थोड्याच दिवसांत आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. त्याचप्रमाणे तीर्थरामांना रँग्लर होण्यासाठी मिळालेल्या शिष्यवृत्तीवरही त्यांनी पाणी सोडले.

लाहोर येथे तीर्थरामांनी स्वामी विवेकानंदांची वेदान्तावरील व्याख्याने ऐकली. नंतर ते हिमालयात निघून गेले व त्यांनी संन्यास घेतला. तेव्हापासून तीर्थराम 'रामतीर्थ' म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९०२ मध्ये, रामतीर्थ जपानला गेले. तेथे त्यांनी वेदान्तावर व्याख्याने दिली.

इ.स. १९०४ साली रामतीर्थ अमेरिकेला गेले. अमेरिकेमध्ये स्वामी विवेकानंदांइतकेच, रामतीर्थांचे सहर्ष स्वागत झाले. हिन्दुस्थानात परत आल्यावर रामतीर्थांनी आपली शिष्यपरंपरा चालू केली.

तीर्थराम एकदा गंगास्नानासाठी गेले असता पायाखालचा दगड निसटून बुडून मरण पावले. (इ.स. १९०६)

रामतीर्थ हे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी सत्पुरुष, कवी व तत्त्वज्ञानी होते.

▶▶

## १. संत येती घरा

पश्चिम पंजाब! आज आहे तो पाकिस्तानात! त्याचा 'गुजराणवाला' जिल्हा. त्यात 'मुरलीवाला' हे खेडे. तेथे एक गोस्वामी या आडनावाचे कुटुंब राही. उपाध्यायाचा व्यवसाय ते कुटुंब करी. हिरानंद भट हे स्वतः, पेशावरपर्यंत हेलपाटे मारून जोसकी व भिक्षुकी करीत. त्यांच्या पोटी बुधवार ता. २२ ऑक्टोबर १८७३ रोजी एक मूल जन्मले. दिवाळीच्या दिवसांत जन्मलेले ते मूल. "सन्त येती घरा। तोचि दिवाळी दसरा।।" अशी भावना असणाऱ्या त्या घरात, ते नवा कुलदीप मानले गेले. साहजिकच त्याचे नाव तीर्थराम ठेवण्यात आले. पण सगळेजण त्या बाळाला सुटसुटीतपणे राम म्हणूनच हाक मारीत, खेळवित.

▶▶

## २. लगीनघाई

तीर्थराम एक वर्षाचा झाला असेल, नसेल! १८७४ च्या दुष्काळाच्या दिवसांत आईच्या प्रेमाचाच दुष्काळ गोस्वामींच्या घरी झाला. तीर्थरामाची आई देवाघरी गेली. साहजिकच रामाचे संगोपन गाईच्या दुधावर होऊ लागले. थोरला भाऊ गुरुदास व मावशी धर्मा कौर यांनी रामाची निगा अंगावर घेतली. वडिलही आपल्या मुलाची काळजी घेतच होते. दोन उन्हाळे पाहिलेल्या तीर्थरामाला



एक जन्माची जोडीदार त्यांनी पाहून व ठरवून टाकली. पाळण्याला बाशिंग बांधून मुलीचे लग्न करण्याचा तो काळ नव्हता का? ती मुलगी दिवाण मसादिमल यांची एकुलती एक नात होती! रणजितसिंगाच्या दिवाणाची हँ! गुजराणवाला जिल्ह्याचा वझिराबाद तालुका होता ना? त्यातील विरोके गावच्या पंडित रामचंद्रांची ती कन्या हो! साखरपुडा झाला. तरी लगीनघाई नव्हती, बरे का? राम दहा वर्षांचा झाला म्हणजे "शुभ मंगल" करावयाचे ठरले. रामची आई गेली; ती काही आपण आणू शकत नाही; तेव्हा त्याची "भोज्येषु माता" आपण पाहून ठेवलेली बरी. ही होती दक्षता हिरानंदांची.

▶▶

## ३. शाळेचा अभिमान

राम पाच वर्षांचा झाला. तसा त्याला घातला शाळेत. मुरलीवाला गावचीच गावठी शाळा ती! तेथे शिक्षण असे उर्दू या भाषेतून. शाळेच्या मौलवींना रामसारखा चुणचुणीत विद्यार्थी पाहून आनंदच आनंद झाला. रामची स्मरणशक्ती दांडगी. दहा वर्षांच्या आतल्या या मुलाने उर्दूलिपीतील दोन ग्रंथ तोंडपाठ केले. गुरुपेक्षा शिष्य सवाई झाला की गुरुजींना मूठभर मास चढते. अभिमान वाटतो. रामच्या मौलवींचा तोच दिमाख होता. त्यांच्या शाळेतला राम हाच सगळ्या बाजूंनी पहिला. त्यामुळे राम म्हणजे शाळेचा अभिमान.

▷▷

## ४. पालक परमेश्वर

राम दहा वर्षांचा झाला. त्याचे ठरल्याप्रमाणे लग्नही झाले. आपण त्याच्या पाठीमागे "उद्याचा आणा" लावला. पण तो 'आणा' भागवायला रामाचा हात मिळवता झाला पाहिजे म्हणून त्याला गुजराणवाला येथील मिशन हायस्कूलमध्ये घालावयाचे हिरानंदानी ठरविले. विद्या अर्थकरी हवी. एकोणिसाव्या शतकात "यस प्यस"चे शिक्षण पैसे मिळवू शिक्षण होते.

म्हणून हिरानंदांनी रामाला भगत धन्नाराम यांच्या देखरेखीखाली हायस्कूल शिक्षणासाठी ठेवले. धन्नाराम हिरानंदांचे जीवश्चकंठश्च; जातीचा तांबट, पण एरवी लाख माणूस! लिहावाचाय पुरतेच शिकलेला, पण परमार्थात मोठी प्रगती केलेला. ब्रह्मचारी राहून पहिलवानी तो करी. योगवाशिष्ठावर तो अशी प्रवचने करी की शिकलेसवरलेले कान टवकारून ऐकत. माणसाला पाहिले की धन्नाराम त्याची पारख करी. अशा पालकाच्या हाताखाली राम हायस्कूल शिकू लागला. धन्नाराम तीर्थरामाला खरोखर भगवान-राम वाटे.

▶▶

## ५. सदासर्वदा देव सन्नीध आहे

गुजराणवाला येथील मिशन हायस्कूलमधून राम मॅट्रिक झाला. आपली घरची गरिबी आणि आपले कुटुंब सनातनी; तेव्हा पुरे झाले रामाचे तेवढे शिक्षण! असे वाटले हिरानंद गोस्वामींना. अहो, (न वदेत् यावनीं भाषां प्राणैः कंठगतैरपि।) प्राण कंठाशी आले तरी यावनी भाषा बोलायची नाही असा खरा शिरस्ता. पण बदललेल्या काळापुढे मान वाकवायची म्हणून रामाला मॅट्रिक केले; पुरे झाले तेवढे! आता रामाने दोन पैसे मिळवावेत आणि कुटुंबाची गुजराण करावी ही होती आस्था हिरानंदांची.

पण राम निराळेच मनोराज्य करीत होता. लाहोराला जावे, फोरमन कॉलेजमध्ये नाव घालावे, पदवीधर व्हावे, अशी होती रामच्या मनाची उडी. वडिलांना वाटे हा का व्यवहार? गुजराणवाला हे सहा मैलांवरचे गाव मुरलीवाला गावापासून; लाहोर कोठल्या कोठे? उगाच आपल्या मुलाला डोळ्यादेखत परदेशी करायचे? साफ कबूल नव्हते ते हिरानंदांना.

पण राम कुठला ऐकायला? बरे आहे, ऐकत नाही तर न ऐकू दे! आपण त्याला एकही पै शिकायला देणार नाही, असे हिरानंदानी साफ साफ सांगितले. फार काय, पंधरा वर्षांच्या रामाकडे नेऊन त्याची 'परकरी पोरगी' असलेली बायको गुदरली हिरानंदांनी! मुलाला वठणीवर आणायचा हिरानंदांनी काही दिवस केलेला हा जालिम उपायही शंकरांच्या गळ्यात उतरलेल्या हलाहलासारखा थंडा पडला!!

लाहोरला डॉ. रघुनाथ मल म्हणून रामाचे एक काका होते. ते असिस्टंट सर्जन होते. विद्यार्जनासाठी धडपड करणाऱ्या रामाला त्यांनी हाताशी धरले. गरजेच्या वेळी ते दोन पैसे देऊ लागले.

पण हे सारे पुढे. प्रथम लाहोरला आल्यावर रामला "दिधली स्थिती देवाने तीतच सुख मान रे।" ही वृत्ती धरावी लागली. (विद्यार्थिनः कुतः सुखम्।) विद्या हवी तर सुखासुखी कोठून ती मिळणार? रामाला विचार करावा लागला. १८ मे १८८८ रोजी धन्नाजींना लिहिलेल्या पत्रात राम लिहितो.

"फोरमन ख्रिश्चन कॉलेजात मी सोमवारी नाव घेतले. वाच्छोवली भागात दरमहा एक रुपया भाड्याने मी एक खोली घेतली आहे. मला कसलीही शिष्यवृत्ती मिळाली नाही. येथील कॉलेजची फी दरमहा साडेचार रुपये आहे."


रामाने राहणी साधी ठेवली. अंगावर खादीचे कपडे अवघ्या तीन रुपयांचे तो वर्षभर वापरी. पादत्राणे नऊ आण्यांची! एकदा (चारपाई) बाजले तुटले तर ते पाच आण्यात विणून घेतले. एकेक दिवस एवढ्याही मोलाचे अन्न राम खात नसे. पंजाबी असूनही साध्या दूधभातावर स्वारी दिवस काढी! उधळपट्टी काय ती पुस्तकखरेदीवर आणि रातदिव्याच्या तेलावर! तेव्हा कॉलेजमधला मिठाईवाला रामसारख्या तल्लख पण बाणेदार विद्यार्थ्यावर खूष झाला. तो मधून मधून रामला आपल्याकडे आग्रहाने जेवायला घेऊन जाई. ते पाहून रामचे सवंगडीही ती सहानुभूती दाखवू लागले. असे चंद्रमौळीचे जीवन काढीत राम एफ. ए. ची परीक्षा पास झाला, ती सर्वांत पहिला येऊन! मग काय? प्राचार्यांनीच त्याला वसतिगृहात येऊन राहण्यास सांगितले.

▶▶

## ६. मनी धरावे ते होते

राम कॉलेजमधील पहिल्या वर्षाची परीक्षा सर्वोत्तम रीतीने पास झाला.

बी. ए. ला जाताना, त्याने संस्कृत घ्यावयाचे ठरविले. कॉलेजचे



प्राचार्य, प्राध्यापक म्हणाले– "संस्कृत म्हणजे चेष्टा आहे की काय? राम, तुझ्या शिक्षणाला आरंभ उर्दूतून! संस्कृतचे

"रामो हरिः करी भूभृत भानुः कर्ता च चंद्रमाः।"

एवढेही कधी तुझ्या जिभेवर रुळले नाही. तर संस्कृत तुला जुळणारच नाही."

राम उत्तरला– "मनी धरावे ते होते!"

अन् दोनच आठवड्यात रामने रघुवंशातील श्लोकांचे पाठांतर व एका महिन्यात दोन सर्ग अन्वय-अर्थ-रसग्रहणासह तयार करून दाखवले.

मग त्याला कोण म्हणणार "संस्कृत घेऊ नकोस!"

►►

### ७. हा हन्त! हन्त!!

राम सर्व विषयांत उत्तम प्रकारे निष्णात. तरीही गणितातील नियमितपणा व नेमकेपणा यामुळे त्याला गणिताविषयी अधिक

आवड होती. तिचे चीज नवलपूर्ण झाले.

राम बी. ए. च्या वर्गात असताना एकदा त्याचे गणिताचे प्राध्यापक आजारी पडले. प्राचार्यांना रामचे बुद्धीप्राविण्य ठाऊक असल्यामुळे त्यांनीच रामला गणिताचे तास घेण्यास सांगितले. सर्वांना खूपच आश्चर्य वाटले, की किती मोठा झाला आपला राम!

पुढच्या वर्षी बी. ए. ची परीक्षा रामने दिली. (इ. स. १८९२) सर्व पेपर्स व्यवस्थित लिहिले. काळजीच काय? परीक्षेचा निकाल रीतसर जाहीर झाला. रामचे नाव त्यात कोठे होते? रामचे सर्व विषय चांगले गेले होते. सर्व विषयांतील गुणांची बेरीज केली असता तो सर्व विद्यार्थ्यांत पहिला ठरत होता. पण!! त्याला एका इंग्रजी विषयात मात्र कमी गुण पडले! त्यामुळे त्याचा निकाल जाहीर झाला होता– 'राम नापास!' हा दुसरा मोठा आश्चर्याचा धक्का रामला, त्याच्या मित्रांना, प्राध्यापकांना– सर्वांना, सर्वांनाच जाणवला!!! त्या वेळचा नियमच असा होता ना की, एका विषयात जरी गुण कमी मिळाले तरी तो विद्यार्थी नापास! नियम तो नियम.

याचा परिणाम व्हायचा तोच झाला. रामची शिष्यवृत्ती संपली. आता काय! अंधार!

–सूर्यास्ताच्या वेळी तळ्यातल्या कमळात भुंगा मध प्राशन करण्याकरता यावा आणि सूर्यास्ताबरोबर त्या कमळाच्या पाकळ्या मिटून तो भुंगा त्यात बंदीवान राहवा; तरीही त्याने आशा करावी की, लवकरच सूर्योदय होईल व आपण या बंदीवासातून मुक्त होऊन स्वच्छंद विहार करू. पण स्वप्नातच एक हत्ती पाणी पिण्यासाठी तळ्यात यावा अन् त्याने तेच कमळ उपटून टाकावे!! मग त्या भुंग्याची जी निराशा, दुर्दशा, तीच आता रामची!!!

►►

## ८. मागणे लई नाही; गरजेपुरते देई

घरून तर छदाम येत नाही; मग आता फिरून कॉलेज व परीक्षा करायची कशी?

साखरेचे खाणार त्याला देव देणार. रामचे एक प्राध्यापक गिल्बर्टसन रामची अर्धी फी देऊ लागले. आणि मग? "अनंत हस्ते कमलावराने। देता किती घेशिल दो कराने।" असे रामला होऊन गेले. ११ जून १८९२ रोजी प्राचार्यांमार्फत रामकडे त्रेपन्न रुपये आले. दाता तर समक्ष नव्हता; आणि प्राचार्यही त्याचे नाव सांगेनात. तेव्हा राम प्राचार्यांना म्हणाला– "मला एवढे पैसे नकोत. मला अर्धेच पुरेत. बाकीचे कॉलेजच्या कारणी लावा."

प्राचार्यांनी साफ नकार दिला.

रामने मग विनंती केली– माझी अर्धी फी प्रा. गिल्बर्टसन भरतात; त्यांना द्या.

रामची डाळ शिजली नाही. तेव्हा आपल्या गरजेपेक्षा अधिक असलेले पैसे रामने अयोध्याप्रसादाला देऊन टाकले.

►►

## ९. कोणतेही सोडवा, तर कोणतेही तपासा

बी. एत. त्या परीक्षेला राम बसला, परीक्षेच्या एका प्रश्न पत्रिकेत तरा प्रश्न होते. "तेरा पैकी कोणतेही नऊ सोडवा" असा सवलतीचा शेरा त्या प्रश्नपत्रिकेच्या सुरुवातीस होता.

परीक्षेच्या ठराविक वेळात रामने तेराही प्रश्नांची उत्तरे लिहिली. आणि? उत्तरपत्रिका तपासणीसाठी सादर करताना पहिल्यात पानावर विनंती लिहून टाकली की, "तेरापैकी कोणतेही नऊ प्रश्न तपासावेत!"

याला म्हणतात आत्मविश्वास. याला म्हणतात पक्का अभ्यास.

►►

## १०. जनसेवा ही ईश्वरसेवा। जन्म तिच्यास्तव माझा जावा

सन १८९३ मध्ये राम बी. ए. ची परीक्षा इंग्रजीसह सर्व विषयांत सर्वप्रथम येऊन पास झाला आणि त्याला दरमहा साठ रुपयांची शिष्यवृत्तीही मिळाली. त्याचा एम. ए. चा अभ्यास सुरू झाला.

त्या सालच्या (१८९३) १७ जुलैपासून केव्हा तरी, राम रावी नदीच्या तीरावर फिरायला गेला असता, सरकारी कॉलेजचे प्राचार्य बेल रामला भेटले. बोलण्याच्या ओघात रामने अनेकानेक उत्कृष्ट इंग्रजी कविता बेलसाहेबांना म्हणून दाखवल्या. त्यावर प्रा. बेल इतके खूष झाले की, त्यांनी रामला आपल्या गाडीत आपल्याजवळ बसवून आपल्या बंगल्यावर नेले. घरची स्थिती, प्रकृती वगैरेची विचारपूस झाल्यावर प्रा. बेलनी विचारले, "पुढे काय करायचे ठरविले आहे तुम्ही?"

"मी माझ्या शेवटच्या निश्वासापर्यंत परमेश्वराची सेवा करायचे ठरविले आहे. जनसेवा तीच ईश्वरसेवा मी मानतो. आणि जनसेवेचा उत्कृष्ट मार्ग म्हणजे लोकांना गणित शिकविणे."

▶▶

## ११ विद्या प्रदानाय।

सरकारी कॉलेजातून गणित-गौरवाने राम एम. ए. झाला. १८९४ साली गणितात अधिक प्राविण्य मिळविण्यासाठी केंब्रिजला जाण्याचे रामच्या मनात आले. प्राचार्य बेल व विद्यापीठाचे मदतनीस-रजिस्ट्रार- बाबू चंद्रनाथ मित्र यांनीही रामला त्याबाबत उत्तेजन दिले, "हिंदुस्थान सरकारची शिष्यवृत्ती मिळवण्याची खटपट करा; आपणही त्याबाबत मदत करू," असे त्या दोघा महाशयांनी रामला वचन दिले. त्याप्रमाणे खटपटीही झाल्या. पण हिंदुस्थान

सरकारची मर्जी महाराष्ट्रातील रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे यांना शिष्यवृत्ती देण्याची लागली. राम म्हणाला– "यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः। सर्वसंचालक निरपेक्ष प्रभूच्या प्रसन्नतेला जे मानवले तेच मानले पाहिजे." त्यावर रामला कोणी सुचविले की प्रांतिक सरकारची नोकरी तरी धरावी. रामने ताडकन् उत्तर दिले– "मी कष्टासायासाने संपादिलेली ज्ञानसंपदा विक्री वा सौद्याकरता संपादिली नाही. कुबेराचा हा इतमाम कर्णाच्या उदारतेने लोकसेवेस लावण्यासाठी आहे."

▶▶

## १२. "प्रारंभीचे निश्चित पाऊल खास यशाचे धनी"

राम सरकारी कॉलेजात एम. ए. चा अभ्यास करीत असताना त्याला एक सोनेरी घड्याळ बक्षीस मिळाले होते. प्रा. गिल्बर्टसन यांची ती आपल्या शिष्यास देणगी होती. तेच नव्हते का कित्येक दिवस रामची अर्धी फी फोरमन ख्रिश्चन कॉलेजात शिकत असताना भरत? पण शिष्यगौरवानी जीवनाचा का प्रश्न सुटतो?

तेव्हा रामने गणिताचे खाजगी वर्ग सुरू केले. एम. ए. व. बी. ए. च्या परीक्षांचे गणित आता प्राध्यापक राम गोसाई शिकवू लागले.

ते वर्ग विद्यार्थीप्रिय झाले. फार काय, शाळा, कॉलेजांतून गणिताच्या शिकवण्या करणारा शिक्षकवर्गही प्रा. गोस्वामींच्या वर्गात येऊ लागले.

सारे खरे; पण प्राप्ती? हाती तोंडी कसा तरी मेळ बसे. कुटंबाचा कर्ता व मिळवता पुरुष म्हणून तीर्थरामाच्या मिळकतीवर घारीसारख्या झडपा पडायच्या व ते जिकीरीला यायचे? पण त्यांनी मनाची शांती ढळू दिली नाही. "जीवन हे समस्यांनी

भरलेलेच असायचे! ज्या जीवनात समस्याच नाहीत, ते जीवन कसले? आणि त्या समस्या यशस्वीपणे सोडून दाखवणे म्हणजेच रसरशीत जीवन,'' असे तीर्थरामांचे मत होते.

आपल्या समस्यांवर मात करण्यासाठी आपणास महिन्याच्या महिन्याला नेमकी प्राप्ती हवी, असे त्यांच्या मनाने घेतले. म्हणून मग प्रयत्न करून सियालकोट येथे त्यांनी काम मिळविले. पण १८९६ मध्ये तीर्थरामांच्या स्वतःच्या फोरमन ख्रिश्चन कॉलेजमध्येच त्यांना काम मिळाले. शंभर रुपये पगार मिळू लागला. गुणसंख्या अठरा अंकांची व गुणक संख्या सतरा अंकांची असली तरी, वेळ न लागता एकदम बिनचूक गुणाकार मांडणाऱ्या प्राध्यापक तीर्थराम गोस्वामींवर विद्यार्थी खूषच खूष असत. ''गणित शिकवावे कसे?'' हे पुस्तक तीर्थरामांनी या वेळेस प्रसिद्ध केले आणि सव्वाशे रुपये खर्चून ते सर्व जिज्ञासूंना मोफत दिले. साऱ्या जगभर पसरलेल्या त्या पुस्तकाची प्रशंसाही जगभर झाली.

►►

## १३. वाटचाल

तीर्थराम गोस्वामी आपल्या कॉलेजात विद्यार्थ्यांना गणित शिकवीत; त्यात विद्यार्थी रंगत. विद्यार्थ्यांच्या रसरंगाने तीर्थरामही तल्लीनच होत.

पण प्राध्यापक गोस्वामींच्या अंतरीची आच निराळीच होती! बंगालमधील चैतन्य व गौरांग महाप्रभू यांच्या सांप्रदायांचा त्यांच्या मनावर पगडा होता. स्वामी विवेकानंद आणि द्वारकापीठाचे शंकराचार्य लाहोरास आले. त्यांच्या व्याख्यान-प्रवचनांनी प्रा. गोस्वामींच्या आध्यात्मिक आकांक्षेने उसळी घेतली. उपनिषदांतील अद्वैताने तीर्थरामांना 'वेडे' केले म्हणाना! रावी नदीच्या काठी तास न् तास् ते गंभीर चिंतनात घालवू लागले. ''कृष्ण, कृष्ण, राधेश्याम,



सावळा मुरलीधर घनश्याम'' हा जप तर देहभान विसरून होऊ लागला!

रावीतीरी एकदा तीर्थराम असे देहभान विसरून भजनात दंग असता, पुढे एक नाग फणा काढून त्यांच्या पुढे डोलू लागला. तीर्थराम समाधीतून जागे झाले. म्हणाले, ''शेषदेवा, आपल्या डोक्यावर पावा वाजविणारा तो मुरलीवाला नाही आणलात तुम्ही? मला त्याला भेटायचे आहे. तुम्ही एकटे कशाला आलात? हां! हां! माझ्या भक्तिप्रेमाची पारख करायला? बरे झाले, झाली ना पारख? मग, आणा आता गोपाळकृष्णाला!!''

एवढ्यात एक आवाज आला- ''प्राध्यापक महाशय, भगवान श्रीकृष्ण तर तुमच्याच हृदयात आहे.''

''माझ्यात हृदयात!!''

असे म्हणून तीर्थरामांनी आपले अंतःकरण मारुतीसारखे नखाग्रांनी

विदारले. रक्तबंबाळ अशा आपल्या छातीकडे पाहून पुन्हा उद्‌गारले, "माझ्याच हृदयात! खरेच की !! जे जे भेटे भूत। ते ते मानिजे भगवंत। हा भक्तियोग निश्चित। जाण माझा।।१।। असे अर्जुनालाच भगवंतांनी सांगितले आहे. तो नाग, हे रक्त, हे माझे कपडे सारेच भगवंताचे रूपडे आहे!"

तीर्थरामांनी आपल्या या आध्यात्माच्या पायी मग १८९९ च्या जानेवारीत फोरमन ख्रिश्चन कॉलेजमधील प्राध्यापकी सोडली आणि ओरिएंटल कॉलेजमध्ये ते 'रीडर' म्हणून राहिले!!

▶▶

## १४. विश्वविद्यालयाची पदवी

प्राध्यापक राम गोस्वामी रावी तीरावर निसर्गासी रमत. तसेच अधून-मधून सुट्टीच्या दिवसांत हरिद्वारपर्यंत मजलही मारीत. "डोळा आनंदाचे धन। चिंती केवळ समाधान।।" परमेश्वरी साक्षात्काराची ही पहिली पायरी त्यांनी गाठली होतीच. विकासवादाने रामामध्ये होत असलेली ती उत्क्रांती होती. तिच्यामुळे राम गोसाईंनी प्राध्यापकीचा राजीनामा दिला, याचे कोणास नवल वाटले नाही.

हिमालयात किंवा हरिद्वारला जाताना राम गोस्वामी आपल्या पत्नीला व दोन्ही मुलांना घेऊन जात. पण पुढे पुढे त्या बायका-मुलांना डोंगरकपारीची थंडी व प्रवासाचे हाल वाटू लागले. मग ती घरीच राहू लागली. राम गोस्वामींना "हरिभजनावीण काळ दवडू नको रे।" हे मग आपल्या मनाला सांगावेच लागले नाही. हिमालयाच्या भव्यतेत ते मग तास न् तास जगाचे चैतन्य, कल्याणकर शक्ती, परमेश्वर पाहू लागले. विश्वविद्यालयाच्या अभ्यासात गर्क होऊन जग विसरावे आणि पदवी घेतल्यावर समाजात व समाजाच्या कामाला यावे. बस्स! परमार्थासाठी राम गोस्वामींची तशीच तयारी चालू होती. परमेश्वर जग चालवतो पण कोठे आढळत नाही. तसे

लोक, समाज, राष्ट्र, मानवजाती चैतन्य-भराने कर्मयोगी व्हावेत, असी शिकवण आपल्याला देता आली पाहिजे हा होता हेतू हिमालययात्रांचा. "आहे तरी सर्वांठायी। पाहो जाता कोठेच नाही।।" अशी समाजसेवा, मानवसेवा करता यावी. ती पात्रता यावी, अशी होती तळमळ प्राध्यापक राम गोस्वामींची हिमालय-यात्रांत.

या तयारीमुळेच प्राध्यापकी सोडलेले तीर्थराम गोस्वामी सहा महिन्यांत संन्यासी म्हणून एका गुहेत राहताना आढळले. हा संन्यास त्यांचा त्यांनीच घेतला. गुरू नाही, दीक्षा नाही, विधी नाही, आपले आपणच मुंडण केले, छाटी पांघरली व तीर्थराम हे नाव सोडून स्वामी रामतीर्थ बनले स्वतःच गोस्वामीजी!

▶▶

## १५. प्रवचनाचा परिणाम

डिसेंबर १९०१ मध्ये मथुरेस धर्म-महोत्सव झाला. त्याचे अध्यक्ष स्वामी रामतीर्थ होते. त्यांचे भाषण सर्वांनाच अभिनंदनीय वाटले, मार्गदर्शक झाले. पोलादी मुठीसारखी त्यात तत्त्वनिष्ठा होती. पण त्या मुठीवर घातलेल्या रेशमी हातमोजासारखी स्वामींच्या प्रतिपादनाची भाषासरणी होती. भारतदेशाचा उज्ज्वल काळ जवळ येत आहे आणि प्रयोगशाळांतून रसायनशास्त्राचा अभ्यास आपण करतो, तसा धर्माचा अभ्यास चिकित्सेने झाला पाहिजे. हे दोन सिद्धान्त स्वामी रामतीर्थांनी लोकमानसावर ठसविले.

पुढे रामतीर्थ १९०२ च्या फेब्रुवारीत फैजाबादला शांतीप्रकाशांच्या आश्रमात गेले. त्या वेळी मौलवी मुर्ताना अलिखान रामतीर्थांना भेटले. हात जोडून ते म्हणाले– "मथुरेस मी आपले भाषण ऐकले; आताही प्रवचन ऐकले. मी निःशंक झालो. वेदान्ती साधू म्हणजे राखेतला व भगव्या छाटीतला जादूगार मी मानीत होतो. आपली टर उडवावी, अशा माझा मूळ हेतू होता. पण मी आता



मुळातच बदललो आपल्या विचारधारेने. मला घेता का आपल्या सहवासात?''

स्वामी रामतीर्थ उत्तरले– ''आमचा वैदिक धर्म हा जगाचा धर्म आहे येथे कोणाला मज्जाव नाही.''

►►

## १६. ''या सम हा''

जागतिक धर्मपरिषद जपानमध्ये टोकिओ येथे भरायची होती. १८९३ च्या शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेला स्वामी विवेकानंद अमेरिकेला गेले होते. तसे ते जपानलाही १९०२ साली गेले असते! पण अमेरिकेच्या स्वातंत्र्यदिनी, ४ जुलै १९०२ रोजीच त्यांना देवाघरचे बोलावणे आले होते. मग?

सगळ्यांचे डोळे स्वामी रामतीर्थांवर खिळले. तेहरी संस्थानच्या महाराजांनी रामतीर्थांना धर्मपरिषदेस जाण्यासाठी गळ घातली

आणि व्यवस्थाही केली. २८ ऑगस्ट १९०२ ला रामतीर्थ जपानकडे रवाना झाले.

टोकिओच्या इंडोजपानी क्लबमध्ये स्वामी उतरले. बरोबर स्वामी नारायण हे साथी होतेच. रामतीर्थांचा 'ॐ ॐ ॐ!' हा धीरगंभीर पुकार ऐकून तेथील वातावरण पावन-पावन होऊन गेले.

दररोज संध्याकाळी रामतीर्थांची व्याख्याने झाली टोकिओत! तुफान गर्दी जमे. वेदान्त आणि थिऑसफी यांचा सुरेख संगम त्यांच्या व्याख्यानात आढळे. बुद्धिस्ट-विश्वविद्यालयातही रामतीर्थांचे व्याख्यान झाले.

एके दिवशी रामतीर्थांना बॅरन नैबोकांडो यांच्या घरी निमंत्रण आले. स्वामी दारात दिसताच, यजमान चटकन माजघरात गेले. अन् पटकन् आपल्या बायकोला व मुलांना घेऊन आले. लगेच म्हणाले– "स्वामीजी, माफ करा हं! आपल्या दर्शनाचा सुखसोहळा मी एकट्याने घेणे मला बरे वाटले नाही. माझ्या बायको-मुलांनाही तो मिळावा, असे मला वाटले, म्हणून मी आत गेलो होतो."

आणि सगळ्यांनी स्वामींच्या पायी डोके ठेवले, पुढे बैठक झाली. बोलता-बोलता बॅरनसाहेबांनी विचारले– "स्वामीजी, राग येणारच नाही आपल्याला. पण संसार का सोडलात, हे कळेल का?"

रामतीर्थ उत्तरले–"अहो, गोस्वामी कुटुंबाचा छोटा संसार सोडला, तो गोवर्धनधारीसारखा जगाचा मोठा संसार करण्याकरता!"

टोकिओमध्ये स्वामीजींच्या अशा भेटीगाठी चालल्या होत्या. त्या वेळी छत्र्यांची सर्कस तेथे होती. त्या सर्कशीत जपानमधील टोकिओ-इम्पीरिअल युनिव्हर्सिटीतील पौर्वात्यप्राज्ञ भेटले. त्यांचे नाव प्राध्यापक टाकाकूसू. त्यांचे व रामतीर्थांचे संवाद झाले. बोलणी संपल्यावर प्रा. टाकाकूसू म्हणाले– "मी इंग्लंडमध्ये

प्राध्यापक मोक्षमुल्लरकडे अनेक पंडित व तत्त्वज्ञानी पाहिले. दुसऱ्याही देशी अनेकानेक मला भेटले. पण स्वामी रामतीर्थांच्या संवादानंतर 'यासम हा' असेच माझे मत झाले आहे.''

तेथेच स्वामी रामतीर्थांना कळून चुकले की जपानात सर्वधर्मपरिषद भरण्याची वार्ता जी हिंदुस्थानात आली ती मुळातच अफवा होती!!!

मग पंधरा दिवसांच्या मुक्कामानंतर रामतीर्थ जपानहून अमेरिकेस जाण्यास निघाले. छत्र्यांची सर्कस ज्या बोटीतून जाणार होती, तिच्यातच स्वीमीजींची सोय झाली. निघताना रामतीर्थ म्हणाले– ''नियतीने केवढा अद्भुत व रम्य चमत्कार केला पाहा! हिमालयाच्या एकान्तात मी बसू नये, म्हणून सर्वधर्मपरिषदेची वार्ता हिंदुस्थानात आली अन् जपानात मी आल्यावर ती अफवाच असल्याचे कळले!! आता मी अमेरिकेला निघालो. टोकिओत सर्वधर्मपरिषद नाही! नसे ना का? आता ती राम (तीर्थ) च्या अंतःकरणात व जीवनातच भरत आहे. ती जगात ठिकठिकाणी भरविण्यासाठीच राम आता दूरदेशी फिरणार आहे.''

बोटीवर पाय ठेवण्यापूर्वी टोकिओच्या कॉमर्स कॉलेजात बोलताना स्वीमीजी म्हणाले होते की– ''बुद्धानुयायांनी फार पूर्वी येथे प्रस्थापित केलेला धर्मच नव्या काळाच्या विज्ञानाने सजवून आचारायचा आहे. आपण सारे वेदान्तीच आहा. जपानचे 'राम'च आहात, किती आनंदी, किती सुखी, किती शांतीधारक, किती श्रमजीवी, किती सहकार-समन्वयी!! रामचे मते जीवन जीवन ते हेच. याच जीवनात धर्म आहे.

स्वामी रामतीर्थांच्या जपानमधील मुक्कामाचा परिणाम म्हणजे ''हिंदी जपानी भाई, भाई!'' ही भावना दृढावली आणि जपानी कुटुंबात राहिलेल्या हिंदी विद्यार्थ्यांना स्वतःच्या घरी असल्यासारखेच वाटू लागले.

►►

## १७. रिकामा कसा चालेल कसा?

राम अमेरिकेस पोहोचला. हात हालवीतच तो गेला होता. खिशात नव्हती दमडी मग कुठला आला आहे भरलेला कसा?

"जग अवघड, सुंदर बाळा!!" हा अनुभव कोठे नाही? रामाचा एक मित्र म्हणाला देखील तसे!!

"सोन्याच्या लंकेत आलास तू! इथे रिकामा कसा चालेल कसा? निदान ओळख-पत्रे तरी आणलीस का?"

"कोठून आणणार?" राम उत्तरला.

"मग आटोपलाच की रे बाजार!" तो मित्र म्हणाला. तसा राम हसला. म्हणालाही–"राम काय भुकेचा गुलाम आहे का तहानेचा? शिवाय रामावर जगाचे नि जगावर रामाचे प्रेम आहे, ते कुठे ठाऊक आहे तुला?"

▶▶

## १८. लोका होऊ नये अलौकिक!

अमेरिकेत स्वामी रामतीर्थ लोकांत मिसळू लागले. एकदा एका तीस मैल पळण्याच्या शर्यतीत भाग घेतला. साऱ्या अमेरिकन तरुणांत हे पहिले आले. पण शर्यतीचे बक्षीस त्यांनी स्वीकारले नाही. डॉ. अल्बर्ट हिलर यांच्याकडे स्वामी राहत होते. त्यांच्याकडे लागणारे सरपण रामतीर्थ आपले रोज फोडून द्यावयाचे. आणि फिरून हा हिंदी साधू वेदान्ताची फोड करून व्याख्यानात सांगायचाच! त्यामुळे स्वामींना शिष्य मिळू लागले. त्यांना एक शिष्या मिळाली. तिचे नाव त्यांनी 'गंगा' ठेवले.

या गंगेचा वशिला लावून एक दिवस एक बाई रामतीर्थांच्याकडे आल्या. त्या म्हणाल्या, "माझे बाळ देवाने नेले. तुम्हाला जर देव जेथे तेथे दिसतो, तर माझे बाळ तेवढे देवाजवळून आणून द्या."

रामतीर्थांनी उत्तर दिले–"यात काय आहे? तुमचा बाळ तुम्हाला

मिळेल. पण अगोदर एक गोष्ट केली पाहिजे. दामाशिवाय का कामे होतात?'' बाई म्हणाल्या– ''वाटेल ती किंमत देते मी!''

स्वामी म्हणाले ''अहो, सुखाच्या साम्राज्यात सोनेनाणे नसते उपयोगी. रामाच्या देशातील नाणे लागते तेथे.''

बाई म्हणाल्या ''म्हणाल ती किंमत देते, म्हटले ना?''

स्वामी म्हणाले ''मग असे करा; हा नीग्रो मुलगा आहे ना? याला तुम्ही आपला म्हणा. स्वतःच्या मुलासारखे याच्यावर प्रेम करा-आणि घरचा म्हणून याला वागवा. तसे केलेत तर तुमचा बाळ आपोआप येतो की नाही, पहा!!''

बाई म्हणाल्या ''हे कसे व्हायचे, स्वामी?''

स्वामी म्हणाले ''हे होत नाही, तोवर सुख नाही.''

मग बाईंनी स्वामींचे म्हणणे ऐकले. त्या नीग्रो मुलाला सांभाळला. हळूहळू त्यांची वत्सलता फुलू लागली. त्यांना पुत्रसुख मिळाले.

कॅलिफोर्नियातील लॉस एन्जल्सच्या श्रीमती वेल्मन या मग स्वामींच्या शिष्या झाल्या आणि हिंदुस्थानात येऊन स्वामींच्या धर्मकार्यासाठी स्वामींच्याही अगोदर येऊन राहिल्या. स्वामी त्यांना 'सूर्यानंदा' म्हणत. स्वामींच्या 'ॐ' या एकाक्षरी ब्रह्ममंत्राने त्या भारून गेल्या होत्या.

►►

## १९. अमेरिकेत व अमेरिकेहून

विसाव्या शतकाचे पहिले दशक संपेपर्यंत काळ मोठा चमत्कारिक होता. भारतीय माणसाचे मोठेपण युरोप-अमेरिकेने मान्य केले, तरच ते भारतातही मानले जाई. दादाभाई नौरोजी, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, अरविंद बाबू, महात्मा गांधी, वीर सावरकर अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. स्वामी रामतीर्थांचे तसेच. 'हिंदुस्थानचे जगापाशी हक्काने मागणे' हे रामतीर्थांनी अमेरिकेत

व्याख्यानांनी मांडले आणि ते प्रेसिडेन्ट रूझवेल्टपर्यंत भिडविले. राजकीय पेक्षासुद्धा सर्व स्वातंत्र्य हिंदुस्थानला हवे, हे स्वामींचे म्हणणे युरोपियनांनी नावाजले की रामतीर्थांचे नाव हिंदुस्थानातही मुलाबाळांचे तोंडी झाले.

माणुसकीचा धर्म जाणून भारतीय युरोपियनांकडे 'बंधुभावा'नेच बघतात. पण इंग्रजांना राज्यकर्ते आक्रमक म्हणून धिक्कारतात. हे स्वामींनी आपल्या 'हक्कमागणी' प्रतिपादनात स्पष्ट केलेच होते. जगाने भारताचे आध्यात्मिक ऋण मान्य करावे आणि आर्थिक, राजकीय, सामाजिक कुचंबणा इंग्रजी राजवटीमुळेच होत आहे, तिच्यातून भारताला मोक्ष मिळविण्यास सहाय्य करावे, अशीही आर्जवे स्वामींनी केली होती. 'हिंदुस्थानच्या जीवावर जगून देशामागून देश गब्बर झाले. हिंदुस्थानकरता जीव टाकता टाकता, कोलंबसला अमेरिका खंड सापडले. जी भूमी जगाला एक वेळ शिरसावंद्य होती, ती भूमी जगाच्या आता पायाखाली सापडली आहे, इकडे सगळ्यांचे लक्ष वेधतो आहे. आमच्या हिंदुस्थानच्या लोकांत, खालच्या आणि वरच्या लोकांत सत्याबद्दलचे निःस्वार्थी प्रेम आणि स्वातंत्र्याची आच बिंबवण्याची निकड आहे. शिक्षणाची आदिदेवता स्वातंत्र्यच आहे.''

स्वामी विवेकानंदांनंतर स्वामी रामतीर्थांनी अमेरिकेत वैदिक संस्कृतीचा झेंडा उंचच उंच फडकत ठेवला आणि तोलामोलाचे मातबर विद्वानसुद्धा आपले शिष्य करून सोडले.

ऑक्टोबर १९०४ मध्ये रामतीर्थांनी आपले पाऊल हिंदुस्थानाकडे वळवले. येताना कैरो येथील मशिदीत त्यांनी पर्शियन भाषेत एक व्याख्यान दिले. हिंदूंतील साधुश्रेष्ठ भेटल्याचा आनंद त्या व्याख्यानाने इजिप्शियन मुसलमानांना झाला. पोर्टसय्यदला आल्यावर, (ज्या बोटीचे तिकीट आगाऊच स्वामींसाठी काढून ठेवलेले होते, त्या) बोटीने हिंदुस्थानकडे येण्याचे स्वामींनी रहित

केले. कारण विचारता, स्वामी म्हणाले, "दोन बादशहा एकाच बोटीतून प्रवास करू शकत नाहीत."

लोक बुचकळ्यात पडले. चौकशी केली तेव्हा कळले की त्याच बोटीने लॉर्ड कर्झन हा हिंदुस्थानचा अरेरावी व्हाइसरॉय प्रवास करीत होता. रामतीर्थांना त्याचे दर्शनही नको होते. त्यांच्या दैनंदिनीत नोंद आढळते की 'इंग्रजी राजवटीचा अकबर लॉर्ड रिपन तर औरंगझेब लॉर्ड कर्झन!'

नंतर स्वामी रामतीर्थ ८ डिसेंबर १९०४ रोजी मुंबई बंदरास पोहोचले. मथुरेला एक दिवस सकाळी रामतीर्थांना आढळले की, ब्रिटिश सरकारच्या गुप्तहेर खात्याचा डोळा आपल्यावर आहे. स्वामी उद्गारले– "भारताच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वसमर्पणाची जरूर आहेच. प्रथम रामचे मस्तक उडेल. मागोमाग हजारो तरुणांची मस्तके उडतील. पण भारत स्वतंत्र होईलच."

▶▶

## २०. हर गंगे, तुझी इच्छा!

पोर्टलंड ऑरेगॉनमध्ये एक महिना, डेन व्हॉरमध्ये एक महिना, शिकागोमध्ये एक पंधरवडा, मिनीपोलिसमध्ये एक पंधरवडा असे मुक्काम करून स्वामी रामतीर्थांनी वैदिक संस्कृतीचा झेंडा अमेरिकेत फडकाविला. ते हिंदुस्थानात ८ डिसेंबर १९०४ रोजी परतले. स्वामींच्या अमेरिकेतील हिंदी विद्यार्थ्यांना निरनिराळ्या विद्यापीठांतून शिष्यवृत्त्या मिळू लागल्या. हिंदुस्थानात आल्यावर रामतीर्थ मुंबईहून मथुरा, अल्वार, मुरादबाद, पुष्कर, जयपूर, हरद्वार, दार्जीलिंग अशी यात्रा करीत, व 'ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म' हा मंत्र देत देत, शिष्यच शिष्य जोडत गेले. पशू, पक्षी, तारे, निसर्गलीला पाहून त्यांना वाटे 'जेथे जातो तेथे देव हो सांगाती। चालवितो हाती धरोनिया।।'

गंगामाईचे प्रेम स्वामी रामतीर्थांना अतीव. हिमालयातील तेहरीसारखे ठिकाण. तेथील महाराजांनी गंगाकिनारी एक झोपडी एकान्तासाठी बांधून दिली होती रामतीर्थांना.

शनिवारी नेहमीप्रमाणेच रामतीर्थ स्नानासाठी गंगेत उतरले. बरोबर त्यांचा आचारी भोला दत्त होताच. रामतीर्थांच्या झोपडीसमोरील गंगाप्रवाहाचा जोर दांडगाच! त्यात उतरून ते पोहू लागले. पण डोळ्याचे पाते लवते न लवते, इतक्यात एका भोवऱ्यात सापडले. स्वामी हात मारीत होते व पाणी घोळ घालीत होते.

भोला दत्त हे सर्व पाहत होता. दिवाळीच्या संक्रमणाचा तो दिवस होता आणि स्वामींच्या प्रयत्नपुरुषार्थाचे पाणी होऊन जात आहे, हे पाहून भोलानाथाची कालवाकालव आणि कासावीस होत होती! तेवढ्यात त्याच्या कानी स्वामींचे शब्द आले– "गंगा माते, आपल्या पोटात मला घ्यावे, एवढीच ना तुझी इच्छा? ठीक! ॐ! ॐ!! ॐ!!!"

सन १९०६ च्या ऑक्टोबरची १७ तारीख होती ती. आदल्याच रात्रौ स्वामींनी 'मृत्यूस आवाहन' अशी एक उर्दू कविता लिहून ठेवलेली होती. ती रविवारी संपादकाकडे द्यावयाची होती! काय विलक्षण योगायोग?

'सर्व-देशी है ब्रह्म हमारा एक जगह अस्थान नहीं।
राम है सबमें, मुझमे कोई भिन्न वस्तु इन्सान नहीं।।'

►►

## रामतीर्थांचे प्रबोधन

१. दैनंदिन जीवनात वेदान्त येत नसेल तर त्याचा काय उपयोग?... तुम्ही वेदान्तच जगला पाहिजे. वेदान्त हेच सर्वांगीण सत्य आहे.
२. धन्य धन्य ते दरिद्रता। अश्रुधारांचिया जिन्याने तत्त्वता। ते करी ईश्वरी सिंहासना पावता। प्राणिमात्र।।१।।
३. दैवाला धारेवर धरील त्यालाच ते नमेल.

४. दृढनिश्चयासारखे या जगात दुसरे अमौलिक काही नाही.

५. देशभक्त व्हायचे आहे ना तुम्हाला? मग देशातील लोकांचा नि तुमचा एक सूर लागू द्या; देशबांधवांशी एकजीव व्हा; तुम्ही आणि तुमचे देशबांधव यांच्यामध्ये 'मी' पणाची एवढीशी छाया येऊ देऊ नका; ती आली की किरणचित्राची सगळी काच बिघडून जाईल. देशाच्या हितसंबंधापायी तुमच्या वैयक्तिक स्वार्थाचा धूपदीप प्रज्वळणारे अस्सल आध्यात्मिक सेवेकरीच तुम्हाला झाले पाहिजे. मित्रहो, माझा श्वास म्हणजे भारताचा श्वास, माझी चाल म्हणजे भारताची चाल, माझे कर्तृत्व म्हणजे भारताचे कर्तृत्व अशी आत्मनिवेदनाची भक्ती साधेल, तेव्हाच तुम्ही देशभक्त. हाच साक्षात्कार साधा.

६. हिंदुस्थानात राष्ट्रीयत्वाची खरी वाढ व्हावयाची असेल, तर नुसत्या परधर्मसहिष्णुतेने ती होणार नाही; परस्पर-सहकार-समन्वयानेच ती होईल. हा परस्पर सहकार अंतःकरणपूर्वक प्रथम झाला की सर्व डोकी आणि हात आपोआपच तो मार्ग अनुसरतील. संपर्क, गुणग्रहण आणि समान प्रवृत्ती यांच्या प्रवाही सातत्याची त्यासाठी गरज आहे. व्यावहारिक वेदान्ताचा एकतासाक्षात्कार त्यायोगेच होईल.

७. राष्ट्र मोठे होते ते बड्या धेंडांच्या चिमुरड्या विचारसरणीने होत नाही. माणसे सत्तास्थानांची हाव धरतात. पण सर्व राष्ट्राच्या जीवात तुम्ही आपला जीव मिळवलात, म्हणजे तुमच्या शब्दाला आपोआपच एवढा भाव येईल की त्याची शक्ती अमोघच राहील.

८. ज्ञानयोग, कर्मयोग भक्तियोग, यांच्या त्रिवेणी संगमावरील सेवयोग हाच व्यवहार, हाच वेद!

९. आत्महत्येने जीवनाचे प्रश्न सुटत नसतात. ज्या रकमांची बेरीज आपणास जमत नाही, त्या पाटीवरून पुसूनच टाकल्या, तर अंकगणित आपणास येईल काय?

१०. हाती घेतलेले काम, अंगावर पडलेले काम, परिस्थितीने कर्तव्य म्हणून करावे लागणारे काम, मनाच्या वा मेंदूच्या ऊर्मीने करावयाचे काम- कसले का काम असेना, ते जीव लावून केले पाहिजे. यंत्र जसे चालते तसेच आपले शरीर, मन, मेंदू यांना ते एक काम एवढेच ठाऊक! त्या कामापुरताच जगातील इतर घडामोडींवर आपला डोळा पाहिजे. 'पांडुरंगी

लागली टाळी! कोण देहाते सांभाळी?' अशी अवस्था जेव्हा आपल्या कामासंबंधी होईल, तेव्हाच आपण कर्मयोगी होऊ.

११. माणसे विकारवश होतात आणि बेजबाबदारपणे वाटेल ते बोलत सुटतात. त्यांना आपण माफीतच काढले पाहिजे. माणसामाणसात सलोखा नसला तरी शांती नांदलीच पाहिजे. 'साधूंचे लक्षण। एक क्षमादान।।'

१२. महात्मे आपला तोल कधीच जाऊ देत नाहीत.

१३. दिरंगाई आणि विरोध माणसाला होतात, त्यात माणसाच्या अंतर्गत सामर्थ्याचा आणि शुद्धीचा विकास साधण्यासाठीच होतात, असे माणसाने मानावे. कोणतीही क्रांती अगर प्रगती, विरोध आणि झटापट यांच्या दिव्यावाचून कधीच होत नसते. विरोध आणि झटापट यांना अतिथिधर्माने युक्तिबुद्धीचा आहेर द्यावा.

▶▶

## रामतीर्थांचे जन्मटिपण

| | |
|---|---|
| इ. स. १८७३ | ऑक्टोबर २२ तीर्थरामाचा जन्म. |
| इ. स. १८७४ | मातृसुखाला आचवला. |
| इ. स. १८७५ | साखरपुडा झाला. |
| इ. स. १८७९ | उर्दू शाळेत प्रवेश. |
| इ. स. १८८३ | विवाह, गुजराणवाला हायस्कूल मध्ये प्रवेश. |
| इ. स. १८८८ | मॅट्रिक पास व लाहोरास कॉलेजसाठी प्रयाण. |
| इ. स. १८९२ | सगळ्या युनिव्हर्सिटीत गुण-मिळवणीने पहिला आला असला तरी इंग्रजी विषयात गुण कमी पडल्याने बी. ए. परीक्षा नापास. |
| इ. स. १८९६ | कधी तेल नाही तर कधी जेवावयासच नाही, असे दिवस काढून एम. ए. गणिताचे प्राध्यापक. |
| इ. स. १९०० | हिमालययात्रा. |
| इ. स. १९०१ | धर्ममहोत्सवा (मथुरा) चे अध्यक्ष. |
| इ. स. १९०२ ते १९०४ | जपान, अमेरिकेत वैदिक संस्कृतीचा प्रचार करून स्वामी विवेकानंदांची परंपरा चालवली. |
| इ. स. १९०६ | गंगेत देहविसर्जन. |

▶▶

# स्वामी रामतीर्थ

पु. पां. गोखले

'स्वामी रामतीर्थांच्या शिकवणीचा प्रसार झाला पाहिजे. केवळ हिंदुस्थानातीलच नव्हे; तर जगातील महात्म्यांत त्यांची गणना आहे. त्यांचे आदर्श मला पूज्य आहेत,'' असे महात्मा गांधीजी सुद्धा म्हणत असत. स्वामी विवेकानंदांनंतर भारताचा माथा जगात उंच राखणारा सत्पुरुष-स्वामी रामतीर्थ. त्यांची माहिती हा आपला ठेवा आहे. तो समजला तर त्यांना शोभेसे काम आपल्या हातूनही थोडे फार होईल. चला तर मग तो ठेवा समजून घेऊ आणि कार्याला सुरुवात करु.

कव्हर छपाई 'विनायक आर्टस'